01:09:08 PM

नि. दि. दावा क्र. ४८/२०१४

शिवाजी वि. सोपान

**निशाणी क्र. ५० लगत**

**वादीतर्फे साक्षीदार क्रं.१ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ एम.एम.भारूका यांच्यामार्फत**

६. माझा जमीन गट क्र.३३१ आहे. गट क्र.३३१ या संपूर्ण गटाचे क्षेत्र ० हे. ३६ आहे. त्यापैकी माझ्या मालकीचे ३६ आर आहे. हे खरे आहे की, गट क्र.३३१ च्या पूर्वेला गट क्र.३२९ आणि ३३४ आहे. गट क्र.३३१ च्या पश्चिमेकडे गट क्र. २३२ चा बांध आहे. गट क्र.३३१ च्या दक्षिणेकडे गट क्र.३३३ चा बांध आहे. गट क्र.३३१ च्या उत्तरेला गट क्र.३३० चा बांध आहे. हे खरे आहे की, पूर्वेला गट क्र.३२९ चा बांध आहे. हे खरे आहे की, गट क्र.३३१ च्या कोणत्या बांधाला लागून पांधी नाही. दाव्यामध्ये दावा मिळकतीच्या चतुःसिमा का लिहल्या नाही याचे कारण सांगता येणार नाही.

७. मला शेतीपासून सरासरी मागील १० वर्षापासून वार्षिक ५० हजार रुपये उत्पन्न मिळाले. हे खरे आहे की, दरवर्षी उत्पन्न थोडे थोडे वाढते. हे खरे नाही की, पांधी रस्त्याशी आमचा काही संबंध नाही म्हणून दाव्यामध्ये माझ्या मिळकतीचे सविस्तर वर्णन व चतुःसिमा नमूद करण्यात आल्या नाहीत. हे खरे आहे की, वादी लता थेटे यांची जमिन माझ्या जमिनीच्या उत्तरेला आहे. मला याची माहिती आहे की, वादी क्र.२ लताबाई यांनी सर्व प्रतिवादी यांच्याशी निशाणी ६५ वरील सलोखानाम्यानूसार सलोखा केला आहे व त्याची मला माहिती आहे. मी तो सलोखा वाचलेला नाही. हे खरे आहे की, वादी क्र.३ सुखदेव हा मयत झालेला आहे. हे खरे आहे की, वादी क्र.२ व ३ यांच्या हददीपर्यंत दावा बंद करण्यात आला. हे खरे आहे की, त्या दोन्ही वादींची जमिन गट क्र.३३० आणि ३१५ आहे. हे खरे आहे की, दोन्ही गटाचा दाव्याशी सबंध राहिलेला नाही.

प्रश्न– तुमच्या म्हणण्याप्रमाणे असणारा रस्ता कोण कोणत्या गटातून जातो हे तुम्हाला सांगता येईल का

उत्तर– रस्ता गट क्र.३३४ व ३३३ ला खेटून जातो. रस्ता गटातून जात नाही.

८. रस्ता गावापासून सुरु होवून नावडीपर्यंत जातो. रस्ता अंदाजे २० ते २२ फुट रुंदीचा रस्ता आहे. रस्ता कोणत्याही गटातून जात नाही. रस्ता गटाला लागून जातो याचा उल्लेख दाव्यामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. रस्ता अंदाजे पाच पन्नास वर्षापासून अस्थित्वात आहे. हे खरे आहे की, एक रस्ता अंधानेरकडे जातो. रस्ता रेलच्या शिवारातून पुढे जातो.

प्रश्न–रस्ता गावठाण हद्दीतून जातो का (साक्षीदाराला ३ वेळा प्रश्न विचारुन देखील तो गावठाणाला खेटून जातो अशी उत्तरे देतो.)

**दुपारची सुटी झाल्यामुळे उलटतपास दुपारच्या सुटीपर्यंत तहकूब**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.04.17 15:42:12 +0530

कन्नड. (वि. द. पाटील)

दिनांक : १७/०४/२०२५ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

01:52:29 PM कन्नड.

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | V. D. Patil, Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 17/04/2025 |
| Order signed by the Presiding Officer | 17/04/2025 |
| Order uploaded on | 17/04/2025 |